MHRG190007312023

:: **<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ७८/२०२० मधील निशाणी क्र.३८ वरील आदेश</u>** ::

अर्ज वाचला. सामनेवाला क्र.३ तर्फे वकीलांनी सदरचा अर्ज रेफरन्स अर्जाचे कामी सामनेवाला क्र.३ चे साक्षीदरम्यान शासनाच्या अधिकृत वेबसाईटवरुन घेतलेल्या पुरपातळीखाली येणारी गावे दर्शविणारे नकाशे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे पत्राची प्रमाणित प्रत, संपादनाच्या वेळेचे सुची क्र.२ च्या प्रती, नगररचनाकार यांचेकडील झोन दाखल्याची प्रत आणि सातबारा उतारे दाखल करुन घेण्याची विनंती केली आहे. विरुध्द पक्षाने सदर अर्जास विरोध दर्शविलेला आहे. अर्जातील कथनांचा विचार करता, सदर कागदपत्रे याकामी दाखल करुन घेणे उचित वाटते. सबब सदर कागदपत्रे दाखल करुन घेण्यात येत आहेत.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.03.30 13:37:04 +0530

महाड,
दिनांकः२३.०३.२०२६

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड